# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः12.12.2025** **वारःशुक्रवार**

1. नवीन उत्पन्न स्त्रोत निर्माण करण्यावर राज्य शासनाचा भर
2. मुंबई शहराला पागडीमुक्त करण्यासाठी स्वतंत्र नियमावली
3. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि केंद्रीयगृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर यांच निधन आणि
4. वीस षटकांच्या दुसऱ्या सामन्यात दक्षिण आफ्रिकेचा भारतावर विजय

**<u>आर्थिक</u>**

खर्चावर कठोर नियंत्रण, काटेकोर आर्थिक शिस्त, संसाधनांचा जास्तीत जास्त वापर आणि नवीन उत्पन्न स्त्रोत निर्माण करण्यावर राज्य शासनाचा भर आहे. राज्यातल्या अवकाळी पाऊस आणि पूरग्रस्त शेतकऱ्यांसाठी केंद्राकडे 29 हजार कोटी रुपयांची मदत मागितली आहे. राज्य सरकारनं आतापर्यंत 44 हजार कोटी रुपये दिले आहेत, अशी माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी काल विधानसभेत दिली. केंद्राची मदत लवकरच मिळण्याची आशा असून दुसरं पाहणी पथक येत्या आठवड्यात येण्याची शक्यता असल्याचं ते म्हणाले. पुरवणी मागण्यांवरच्या चर्चेला ते उत्तर देत होते. यानंतर सुमारे 75 हजार कोटींच्या पुरवणी मागण्या विधानसभेत मंजूर झाल्या.

**<u>पागडी</u>**

मुंबई शहराला पागडीमुक्त करण्यासाठी तसंच पागडी इमारतींचा सुयोग्य आणि न्याय्य पुनर्विकास करण्यासाठी स्वतंत्र नियमावली करण्याची घोषणा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल विधानसभेत निवेदनाद्वारे केली. भाडेकरू तसंच घरमालकांचा हक्कसुद्धा अबाधित ठेवण्यात येईल असंही त्यांनी सांगितलं. 1960 पूर्वीच्या अंदाजे 19 हजारांपेक्षा जास्त सेस इमारती पागडी इमारती म्हणून ओळखल्या जातात. त्यापैकी काही इमारतींचा पुनर्विकास झाला आहे. काही इमारती जीर्ण होऊन पडल्या आहेत. भाडेकरूंच्या ताब्यातील घरांचं क्षेत्रफळ आहे तेवढा एफएसआय देणं, मालकांना भूखंडाच्या मालकीपोटी मूळ एफएसआय देणं, यासह विविध तरतुदी नवीन नियमावलीमध्ये आहेत.

**<u>विधिमंडळ</u>**

विधिमंडळ अधिवेशनाच्या काल चौथ्या दिवशी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात नाफेड आणि सीसीआय मार्फत शेतमाल खरेदी संदर्भात सदस्यांनी विविध प्रश्न उपस्थित केले. 'या खरेदी केंद्रांद्वारे सोयाबिन आणि कापसाला योग्य भाव मिळत नसल्याच्या प्रश्नावर मार्ग काढला जाईल', अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल विधानसभेमध्ये दिली. याबाबतचा प्रश्न सदस्य संतोष दानवे, विजय वडेट्टीवार यांनी सभागृहात उपस्थित केला होता. यावर पणनमंत्री जयकुमार रावल यांनी दिलेल्या उत्तरानं समाधान न झाल्यानं विरोधकांनी गदारोळ केला. विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी यासंदर्भात बैठक घेऊन सरकारला निर्देश देण्याचं आश्वासन दिलं. मात्र तरीही विरोधकांचं समाधान न झाल्यानं विरोधकांनी सभात्याग केला.

दरम्यान, महाराष्ट्र लोक आयुक्त सुधारणा विधेयक 2025 विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात काल संमत झालं. या विधेयकात तीन लहान बदल करण्यात आले आहेत. यामध्ये नवीन भारतीय दंड संहितेचं नाव बदलून भारतीय न्याय सुरक्षा संहिता असं करण्यात आल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं.

छत्रपती संभाजीनगरसह मराठवाड्यातील विविध जिल्ह्यांतील आणि चंद्रपूरच्या राजुरा भागातील सुमारे 70 हजार कुटुंबांना मोठा दिलासा मिळाला आहे. 'मदत माश' इनामी जमिनींवरील निवासी घरं नियमित करण्यासाठी आता कोणताही नजराणा भरावा लागणार नाही. ती घरं मोफत नियमित करून रहिवाशांना जमिनीचे 'वर्ग-1' मालकी हक्क देणारं सुधारित विधेयक विधानसभेत एकमतानं मंजूर करण्यात आलं.

**मुख्यमंत्री पुणे**

पुणे शहराचा विस्तार मोठ्या प्रमाणावर होत असून त्या अनुषंगानं पुणे महानगर क्षेत्रात 220 प्रकल्पांतर्गत विविध विकासकामं हाती घेण्यात आली आहेत. त्यासाठी 32 हजार 523 कोटींचा निधी मंजूर करण्यात आल्याचं काल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं. रस्ते विकास नियोजनानंतरच शहर विकासाचे आराखडे तयार करावेत, असे निर्देशही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी दिले. पुणे महानगर नियोजन समितीच्या पाचव्या सभेचं आयोजन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली विधानभवनातील मंत्रीपरिषद सभागृहात करण्यात आलं. त्यामध्ये ते बोलत होते.

**संसद कामकाज**

राज्यसभेत काल 'वंदे मातरम' या गीताच्या शतकोत्तर सुवर्णमहोत्सवानिमित्त सुरू असलेल्या चर्चेचा समारोप सभागृह नेते जे. पी. नड्डा यांनी केला. 'वंदे मातरम' हा देशाचा आत्मा जागृत करण्याचा मंत्र आणि देशाच्या पुनर्निर्माणाचं आवाहन आहे, असं प्रतिपादन त्यांनी केलं. या चर्चेत 80 पेक्षा जास्त खासदारांनी भाग घेतला.

**मोहोळ**

देशातील सहकाराचे जाळे अधिक मजबूत व्हावं सहकार क्षेत्राचा समप्रमाणात विकास व्हावा, यासाठी सहकार मंत्री अमित शहा यांनी 2029 पर्यंत देशात नव्या दोन लाख बहुउद्देशीय विविध कार्यकारी सहकारी संस्थांची स्थापना करण्याचे उद्दिष्ट निश्चित केलं आहे. त्याअंतर्गत आतापर्यंत 32 हजार एम-पॅक्सची स्थापना करण्यात आली आहे. ही योजना पूर्णत्वास गेल्यानंतर देशातील प्रत्येक पंचायतीत किमान एक सहकारी सेवा संस्था असेल, असं ठाम प्रतिपादन केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी काल राज्यसभेत केलं.

लोकसभेत काल ऊर्जानिर्मिती आणि वापराबाबत चर्चा झाली. भारतात ऊर्जेचा वापर वेगानं वाढत असून येत्या 20 वर्षांत जागतिक पातळीवर ऊर्जेच्या वाढत्या मागणीत 35 टक्के वाटा भारताचा असेल, असा अंदाज आंतरराष्ट्रीय ऊर्जा संस्थेनं वर्तवला असल्याची माहिती पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्री हरदीप सिंह पुरी यांनी काल लोकसभेत पुरवणी प्रश्नाच्या उत्तरात दिली.

तर, पेट्रोलमध्ये 20 टक्के इथेनॉलचं मिश्रण केल्यानं भारताचं कार्बन उत्सर्जन 736 लाख मेट्रिक टनांनी कमी झाल्याची माहिती रस्ते, वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी लोकसभेत दिली. ते म्हणाले....

**इथेनॉल हमारे सरकारों की प्राथमिकता है और प्रधानमंत्री जी के नेतृत्व में जो आत्मनिर्भर भारत का उद्देश्य रखा गया है। उसमें हमारा फॉसिल फ्यूल का इंपोर्ट 22 लाख करोड़ रुपए का है। इथेनॉल एक ग्रीन फ्यूल है और उससे प्रदूषण कम होता है और इसलिए अभी तक जो एथेनॉल हमने यूज किया है। उसके कारण विशेष रूप से कार्बन एमिशन रिडक्शन में 736 लाख मैट्रिक टन इक्विवेलेंट तो 30 करोड़ की लगाएंगे इतना हमने उसमें प्रदूषण कम हुआ है।**

**चप्पल**

कोल्हापुरी चपलांचा वारसा जगभर पोहोचवण्याच्या उद्देशानं जागतिक ब्रॅन्ड प्राडा नं लिडकॉम आणि लिडकार यांच्याबरोबर सामंजस्य करार केला आहे. इटली-भारत व्यापारी परिषदेनिमित्त या करारावर स्वाक्षरी झाली. यानिमित्तानं पारंपरिक कौशल्य आणि आधुनिक लक्झरी फॅशनच्या मदतीनं पारंपरिक कोल्हापुरी कौशल्याला प्राडाची आधुनिक साथ मिळणार आहे. या विशेष कोल्हापुरी चप्पला फेब्रुवारी 2026 मध्ये प्राडाच्या 40 विक्री केंद्रांत तसंच अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध होतील.

**हापूस**

'वलसाड हापूस' असं भौगोलिक निर्देशन मिळावं म्हणून गुजरातमध्ये सुरू असलेल्या प्रयत्नांना कोकणातून तीव्र विरोध होत आहे. विधिमंडळ अधिवेशनातही आमदार शेखर निकम, भास्कर जाधव यांनीही हा मुद्दा उपस्थित केला. दापोलीच्या डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठानेही कोकणी शेतकऱ्यांच्या पाठीशी असल्याची ग्वाही दिली आहे.

**गोवा क्लब आग**

गोवा नाइट क्लब आग प्रकरणातले आरोपी आणि क्लबचे भागीदारसौरभ लुथरा आणि गौरव लुथरा या दोघांना थायलंड पोलिसांनी आज ताब्यात घेतलं.गोव्यातल्या अरपोरा इथल्या क्लबमध्ये गेल्या शनिवारी आग लागून 25 जणांचा मृत्यूझाला होता, त्यानंतर लुथरा बंधू

थायलंडला पळून गेलेहोते. त्यांच्या विरोधात इंटरपोलनं 'ब्लू कॉर्नर नोटिस' जारी केली होती. भारतसरकारच्या विनंतीवरून आज त्यांना फुकेत इथून ताब्यात घेण्यात आलं आणि त्यांनाभारतात परत आणायची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती संबंधित अधिकाऱ्यांनी दिली. त्यांनीकेलेला जामीन अर्ज नवी दिल्ली इथल्या न्यायालयानं फेटाळला आहे.  गोवा सरकारकडून मिळालेल्या प्रस्तावावरून यादोघांची पारपत्रं रद्द करण्याचा विचार सुरु असल्याचं परराष्ट्र व्यवहारमंत्रालयानं म्हटलं आहे.

**निधन**

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि देशाचे माजी केंद्रीयगृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर यांचे आज लातूर येथे दीर्घ आजारपणामुळे  निधन झाले. ते 91 वर्षांचे होते. शिवराज पाटील चाकूरकर हे लोकसभेचे सभापती आणि विविधकेंद्रीय मंत्रीपदांवर कार्यरत होते. त्यांनी आपल्या राजकीय कारकीर्दीत देशासाठीअनेक प्रतिष्ठित पदे भूषवली आणि त्यांनी देशातील संवैधानिक प्रक्रियेत सक्रियभूमिका बजावली होती. शिवराज पाटील हे लातूरमधील चाकूर येथील प्रभावी काँग्रेसनेते होते आणि त्यांनी लातूर लोकसभा मतदारसंघातून सात वेळा विजय मिळवला होता. ते 2004 मध्ये लोकसभेतून पराभूत झाल्यानंतरही राज्यसभेतून गृहमंत्रिपद आणि केंद्रीयजबाबदाऱ्या स्वीकारल्या होत्या. काँग्रेस आणि त्यांच्या संघटनेतील सर्व कार्यकर्त्यांनीत्यांच्या निधनावर दुःख व्यक्त केले आहे.

**निधन**

ज्येष्ठ लेखक अनिल मधुसूदन कालेलकर यांचं काल  मुंबईत अल्पशा आजारानं निधन झालं. ते 78 वर्षांचे होते. त्यांनी 25 हून अधिक हिंदी, मराठी आणि गुजराती चित्रपटांसंह अनेक मालिकांचं लेखनही केलं. त्यांनी लिहिलेल्या 'बंदिनी', 'परमवीर' आणि 'हॅलो इन्स्पेक्टर' या तीनही मालिकांना लागोपाठ तीन वर्षे सर्वोत्कृष्ट मालिकेचं पारितोषिक मिळालं होतं.

**क्रिकेट**

चंदीगड इथं काल झालेल्या वीस षटकांच्या दुसऱ्या सामन्यात दक्षिण आफ्रिकेनं भारतावर 51 धावांनी विजय मिळवला. प्रथम फलंदाजी करताना पाहुण्यांच्या 4 बाद 213 धावा झाल्या. उत्तरादाखल भारतीय संघ सर्वबाद 162 धावाच करु शकला. पाच सामन्यांच्या या मालिकेत आता दोन्ही संघांची 1-1 अशी बरोबरी झाली आहे. तिसरा सामना येत्या 14 डिसेंबरला धरमशाला इथं होणार आहे.

**हवामान**

राज्यातील अनेक शहरांमध्ये आजही थंडीची लाट राहण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे. पारा 8 ते 10 अंश सेल्सियसच्या आसपास आहे. पुण्यामध्ये किमान तापमान 7 अंश सेल्सियसपर्यंत घसरलं आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.